# मुंबई विद्यापीठ

प्रसिध्दी पत्रक

दिनांक – ०७ एप्रिल २०१६

## मुंबई विद्यापीठात हॉलोकॉस्ट आणि टॉलरन्सवर शॉर्टटर्म कोर्सेस

मुंबई – भूतकाळातील घटनांचा अभ्यास करून तसेच मुलांना वंशवाद आणि विद्वेषावर आधारित व्यवस्थेच्या धोक्यांबद्दल अवगत करून भविष्यातील दुर्घटना टाळ ण्याच्या उद्देश्याने व समाजात लोकशाही मूल्यांचे संवर्धन करता या वे यासाठी विद्यापीठात हॉलोकॉस्ट आणि टॉलरेन्सवर शॉर्टटर्म कोर्सेस सुरु करण्यात येणार असल्याचे प्रतिपादन मुंबई विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. संजय देशमुख यांनी केले. हॉलोकॉस्टमधून धडा घेताना मानवी मूल्यांची जपणूक, शिक्षण, लोकशाही, मानवाधिकार, सर्वधर्म सन्मान आणि संयम यांचे सूत्र आपण शिकले पाहिजे तसेच वंशवाद आणि हुकुमशाही व्यवस्थेच्या विरुद्ध आपण सर्वांनी उभे ठाकले पाहिजे असेही त्यांनी सांगितले.ते आज मुंबई विद्यापीठात आयोजित करण्यात आलेल्या ‘ टॉलरेन्स रिमेंबरन्स-कॉमोरेशन ऑफ हॉलोकॉस्ट’ या कार्यक्रमात बोलत होते. हंगेरियन कॉन्सुलेट जनरल,इस्त्राईल कॉन्सुलेट जनरल आणि मुंबई विद्यापीठाच्या सयुंक्त विद्यमाने आज मुंबई विद्यापीठाच्या दीक्षांत सभागृहात या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

दुसऱ्या महायुद्धाच्या कालावधीत नाझी जर्मनी राजवटीद्वारे अत्यंत नियोजनबद्ध पद्धतीने करण्यात आलेल्या, युरोपातील ६० लाख ज्यूंच्या नृशंस नरसंहाराला हॉलोकॉस्ट (हिब्रूमध्ये शोआह) ही संज्ञा वापरली जाते. ज्यू लोकांची छळवणूक आणि संहार टप्याटप्यांत केला गेला. दुसऱ्या विश्वयुद्धाला तोंड फुटण्यापूर्वी काही वर्षे कायदेशीर रितीने ज्यू लोकांना समाजाबाहेर काढण्यात येऊन वाळीत टाकण्यात आले. ठिकठिकाणी छळछावण्या उभारण्यात येऊन त्यात ज्यू लोकांना गुलामाप्रमाणे कामास जुंपण्यात आले. या छळछावण्यांतील अनेक लोकांचा अतिश्रमाने तसे विविध आजारांनी मृत्यू झाला. जेव्हा नाझींनी पूर्व युरोप गिळंकृत करायला सुरवात केली तेव्हा तेथील ज्यू लोकांना तसेच राजकीय विरोधकांना त्यांनी सामुहिकपणे गोळ्या घालून ठार केले. ज्यूंना मोठ्या संखेने घेट्टोमध्ये बंदिस्त करण्यात आले आणि त्यानंतर त्यांना मालगाड्यांत कोंबून मृत्यूछावण्यांकडे रवाना करण्यात येऊ लागले. जे लोक या नरकमय प्रवासांत जिवंत राहीले त्यांना गॅस चेंबरमध्ये विषारी वायु सोडून ठार मारण्यात आले. गोळ्या घालून ठार मारणे, गॅस व्हॅनमध्ये ठार मारणे अशा पद्धतींनी अपेक्षीवढे लोक मरत नाहीत म्हणून गॅस चेंबरची रचना करण्यात आली जेथे रोज रेल्वेगाड्या भरभरुन ज्यू लोकांना पाठवण्यात येत असे. हॉलोकॉस्टच्या परमावधीत दररोज १२/१५,००० लोकांना ठार

मारण्यात ये त होते . नाझी जर्मन शासनाचा प्रत्येक विभाग या हत्याकांडात सहभागी होता आणि अनेक ठिकाणी स्थानिक लोकांचे त्यांना पूर्ण सहकार्य होते. या नृशंस हत्याकांडाच्या आठवणींना उजाळा देण्यासाठी आज विद्यापीठात या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

हॉलोकॉस्ट हा प्रामुख्याने दुसऱ्या महायुद्धाच्या कालखंडात घडला असला तरी त्याची मुळे शतकानुशतके चालत आलेल्या ज्यू लोकांच्या, त्यांच्या वंशाच्या, धर्माच्या आणि परंपरांच्या दुस्वासामध्ये आहेत, ज्याला ऍंटी सेमायटीसम असे संबोधले जाते. या दुःखद आठवणींची मशाल एका पिढीकडून दुसऱ्या पिढेकडे सोपवून हा संदेश त्यांच्यापर्यंत पोहोचवणे गरजेचे आहे. माणुसकीचे तत्व जोपासणाऱ्या एका नवीन आणि सुंदर जगाची निर्मिती हा आपल्या प्रयत्नांचा आधार असायला हवा   असेही त्यांनी सांगितले आणि याच पार्श्वभूमीवर हे शॉर्ट टर्म कोर्सेस विद्यापीठाच्या सेंटर फॉर युरेशिएन स्टडी,राज्यशास्त्र विभाग आणि दुर व मुक्त शिक्षण विभागात हे अभ्यासक्रम राबविण्याचा विद्यापीठाचा मानस असल्याचे त्यांनी सांगितले.यासाठी हंगेरियन कॉन्सुलेट जनरल,इस्त्राईल कॉन्सुलेट जनरल,जर्मनी आणि ऑस्ट्रेलिया कॉन्सुलेट जनरल यांच्या सयुंक्त विद्यमाने हे अभ्यासक्रम सुरु करण्यात येतील.

एकुण दोन सत्रामध्ये या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. पहिल्या सत्रात चर्चासत्र आणि समुहचर्चा याचे आयोजन करण्यात आले होते.यामध्ये अल्पसंख्यांकाच्या अधिकारांचे रक्षणासाठी राज्याची जबाबदारी,युरोपीयन हॉलोकॉस्ट आणि जेवीस एक्साईल इन इंडिया  – नेहरुंची भूमिका,आणि रोमा हॉलोकॉस्ट यावर समुह चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले होते.यामध्ये एंड्रास हेस्लर,हंगेरी,मायकेल सिबर्ट,कॉन्सुल जनरल ऑफ जर्मनी,निम्रोड असोलिन,इस्त्राईल सॅबकल्स टॅक्स,हंगेरियन प्राईम मिनिस्टर ऑफिस,सुमित मलिक,अतिरिक्त मुख्य सचिव आणि डॉ.मंजिरी कामत ,इतिहास विभाग प्रमुख हे सहभागी झाले होते.तर दुस-या सत्रात हॉलोकॉस्ट वर सादरीकरण करण्यात आले.यानिमित्ताने हॉलोकॉस्टच्या आठवणींना उजाळा देण्यासाठी मान्यवरांकडून वृक्षारोपन करुन आणि आदरांजली वाहण्यात आली.मान्यवरांमध्ये युरी येहूदा एरिअल,कृषी मंत्री,इस्त्राईल,डेनिअल कारमन,भारतातील इस्त्राईल राजदुत,डेव्हिड एकॉव्ह,कॉन्सुल जनरल ऑफ इस्त्राईल,डॉ.नॉर्बर्ट रेवाई बेरे,कॉन्सुल जनरल ऑफ हंगेरी,मुंबई विद्यापीठाचे कुलगुरु डॉ.संजय देशमुख यांची प्रमुख उपस्थिती होती.मान्यवरांनी या विषयांवर त्यांचे मत मांडले.आजच्या या कार्यक्रमात या नृशंश हत्याकांडाच्या आठवणींना उजाळा देण्यासाठी चित्रप्रदर्शन भरविण्यात आले होते तसेच लघुचित्रपटाचे आयोजनही करण्यात आले होते.

लीलाधर बन्सोड, उपकुलसचिव (जनसंपर्क / प्रकाशन / सांख्यिकी )